Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education S.R.No.832-A, Final Plot
No. 178,179, Near Balchitrawani,
Behind Agharkar Research
Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, रा.न.८३२
ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९,
बालचित्रवाणी शेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर,
पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmall.com

तातडीचे/महत्वाचे
परीक्षा प्राधान्य

क्र.रा.मं./परीक्षा-७/२३७१
पुणे - ४११ ००४
दिनांक - ५/०६/२०२६

प्रति;

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च मांध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषयः जून-जुलै २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्राबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, जून-जुलै २०२६ साठी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचे प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना जून-जुलै २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) (Hall Ticket) ऑनलाईन(Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर दिनांक ०८/०६/२०२६ पासून Admit Card या link व्दारे download करण्याकरिता उपलब्ध होतील.

१ जून-जुलै २०२६ साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी इ.१० वी व इ.१२ वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.
२ प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.
३ ज्या आवेदनपत्रांना "Paid" असे Status प्राप्त झालेले आहे त्यांचीच प्रवेशपत्रे "Paid Status Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.
४ अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व Extra Seat No विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे "Extra Seat No Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

कृ.मा.प.....



Scanned with OKEN Scanner

५ Download केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव/आईचे नाव/ जन्मतारीख व इतर दुरूस्त्या असल्यास अथवा विषय/माध्यम बदल असल्यास प्रचलित पध्दतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य त्या दुरूस्त्या करण्यात याव्यात.

६ ज्या आवेदनपत्रांना "Paid " असे Status प्राप्त झालेले नाही अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे Status Update होवून "Late Paid Status Admit Card" या Option व्दारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील.

७ प्रवेशपत्रावरील फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.

८ प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पुनःश्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत (Duplicate) असा शेरा देऊन विद्यार्थ्यास प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांना प्रवेशपत्र download करण्यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास विभागीय मंडळाकडे संपर्क साधणेकरीता सूचित करावे व विभागीय मंडळांनी व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ यांचेशी पुढील कार्यवाहीसाठी संपर्क साधावा.

उपरोक्तनुसार आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य तसेच विद्यार्थी यांना सदर बाब अवगत करून देण्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Mali

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-४.

प्रत माहितीसाठी-

व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे-०४.

क.पु.वि.मं/उमा अ/ 4624
दि.०९.०६.२०२६
९१.

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा- पुणे, अहिल्यानगर,सोलापूर

उपरोक्त राज्य मंडळ प्रकटनाच्या अनुषंगाने जून -जुलै २०२६ इ.१० वी व १२ वी परीक्षेकरिता प्रविष्ठ होऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी दि.०८.०६.२०२६ पासून प्रवेशपत्रे www.mahahsscboard.in या लिंकद्वारे उपलब्ध होत असून विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन प्रवेशपत्रांचे वितरण करण्यात यावे तसेच सोबतच्या राज्य मंडळ प्रकटनातील मुद्दा क्र. १ ते ८ चे मधील सूचनांचे अवलोकन करावे.

MBRaut

(डॉ.मीनाक्षी राऊत)
विभागीय सचिव(प्र.),
पुणे विभागीय मंडळ, पुणे- ०५

Scanned with OKEN Scanner